Shri Sarda Education Society (Trust)'s
(A Linguistic Minority Education Institute)

# SMT RADHABAI SARDA ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE

ANJANGAON SURJI, DIST- AMRAVATI (Maharashtra) 444705
(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)
**NAAC Accredited 'A' with CGPA 3.21**

## Departmental of Political Science

## Session -2022-23

## Project Report

## Name of Project - A Study of Political Responsibility of College Students

A project was by the students of BA ll and BA lll of the department of political science. The aim of the project was to study the political responsibility of the college students. The 10 students from BA ll and BA lll had made a survey of 100 students from arts, commerce and science in the college. The selected 100 students were interviewed comprising of various questions on the Indian democracy, constitution, the election process of the various governing bodies from village Grampanchyat to assembly and parliamentary elections. The project was highly successful in which the students had given the answers of the interviewers very enthusiastically. The conclusion of the project was that all the college students which were interview were profoundly aware and sensible of their electoral duties as conscious voters.

**Date:** 20/03/2023

**Head of Department**
**(Shri Surendra H Kinhikar)**

SMT RADHABAI SARDA ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE,
ANJANGAON SURJI

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

ACADEMIC SESSION - 2022-23

**EVENT - PROJECT**

**Brief description of event**

On behalf of the Department of Political Science,a project was implemented in the month of March 2023 on the study of political science responsibility of college students. This project was completed by the students of political science under the guidance of the Head, Department of Political Science,Shri Surendra Kinhikar. The main objective was to find out through the interview whether the college students are aware of politics or not, whether they are registered voters as aresponsible citizen of the country.

**Program Outcomes**

The participants came to know about the eminence of the study of the political structure in the country, the various governing bodies and the responsibility of a dutiful citizens.They also realised the eminence of the role of youth in the countries electoral process and constractive government.

Number of Students and Teachers benefited :- Students - 10

20/03/23

Head of Department

श्रीमती राधाबाई सारडा कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अंजनगांव सुर्जी जि. अमरावती

# राज्यशास्त्र विभाग

शैक्षणिक सत्र 2022-23

दि. 7/03/2023

प्रति,

***मा. प्राचार्य***

श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

अंजनगांव सुर्जी

विषय :- राज्यशास्त्र विभागा अंतर्गत कार्यक्रमाला परवानगी मिळण्याबाबत.

महोदय,

महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागा अंतर्गत शैक्षणिक सत्र 2022-23 मध्ये विविध कार्यक्रम राबवायचे आहेत. त्यापैकी प्रकल्प - वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा राजकीय जबाबदारीचा अभ्यास हा कार्यक्रम विभागा अंतर्गत दि. मार्च 2023 ला आयोजित करण्यात आलेला आहे.

कृपया कार्यक्रमाला परवानगी देवुन उपकृत करावे हि विनंती.

धन्यवाद !

आपला विनित

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

PRINCIPAL
Smt.Radhabai Sarda
Arts, Commerce & Science College
Anjangaon Surji

श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जी

राज्यशास्त्र विभाग

**सत्र - 2022-23**

**सूचना**

बी ए भाग – २ व ३ राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, **महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय जबाबदारीचा अभ्यास** हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांना या प्रकल्पात सहभाग घ्यायचा असेल त्यांनी आपली नावे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरेंद्र किन्हीकर यांचे कडे द्यावीत.

दि. 8/03/2023

विभाग प्रमुख

प्रा. एस. एम. किन्हीकर

KHmdloke
BA II

BvRathi
B.A. III

ABedacle
B.A. III

श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी

राज्यशास्त्र विभाग

सत्र – २०२२-२३

प्रकल्पाचा विषय

"वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय जबाबदारीचा अभ्यास"

मुलाखत देणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव ----------------------------------------------------

वर्ग ------------, वय ------------

प्रकल्पा अंतर्गत विद्यार्थ्यांना विचारण्यात आलेले प्रश्न

१) आपली मतदार म्हणून नोदणी झालेली आहे काय ? (होय /नाही )

२) मतदार म्हणून आपली नोंदणी झालेली नसेल तर ती का करण्यात आली नाही ? (माहिती नव्हती /गरज वाटत नाही /करणार आहे )

३) याआधी झालेल्या निवडणुकीत आपण मतदान केलेले आहे काय ? (होय /नाही )

४) स्थानिक स्वराज्य संस्था विषयी आपणास माहिती आहे काय ? (होय /नाही )

५) आपणास आपल्या वार्डातील नगरपरिषद सदस्याचे नाव माहित आहे का ?

(होय /नाही)

६) आपण देशाचे जबाबदार नागरिक आहोत असे आपणास वाटते का ? (होय/नाही)

७ ) आपले स्वतःचे मत महत्वाचे आहे असे आपणास वाटते का ? (होय/नाही)

८) आपणास आपल्या गावातील समस्या माहित आहेत का ? (होय/नाही/काही काही )

९) समस्या सोडविण्यासाठी आपण काही करू शकता असे आपणास वाटते का ? (होय/नाही /माहित नाही )

१०) गावातील स्वच्छ आणि पारदर्शक राजकारणासाठी आपण मदत करू शकतो असे आपणास वाटते का ? (होय/नाही)

दिनांक -

मुलाखतदाराची स्वाक्षरी

## श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी

### राज्यशास्त्र विभाग

### सत्र – २०२२-२३

### प्रकल्पाचा विषय

**"वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय जबाबदारीचा अभ्यास"**

**प्रकल्पात सहभागी विद्यार्थी**

| | नाव | वर्ग |
|---|---|---|
| १) | कु. प्रतिक्षा ज्ञानेश्वर रेंगारी | बी.ए. भाग-2 |
| २) | कु आंचल संदीपराव राहाटे | बी.ए. भाग-2 |
| ३) | कु नयना गुणवंत वनझाडे | बी.ए भाग-2 |
| ४) | कु. अमृता निरंजन काळे | बी.ए भाग-2 |
| ५) | ऋषिकेश पुरुषोत्तम राऊत | बी.ए भाग-2 |
| ६) | आदित्य गजानन शेरकार | बी.ए. भाग-3 |
| ७) | चेतन भाऊराव वाकोडे | बी.ए भाग-3 |
| ८) | भूषण अरुण गुळदे | बी.ए भाग-3 |
| ९) | कु शिवाणी गजानन निंबोळकर | बी.ए भाग-3 |
| १०) | कु नेहा सुनिल सोनपरोते | बी.ए भाग-3 |

प्रस्तुत प्रकल्प महाविद्यालयातील बी ए भाग- 2 व 3 चे विद्यार्थी राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमानुसार सादर करीत आहे.

मार्गदर्शक
प्रा सुरेंद्र एच किन्हीकर
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

प्रस्तावना -

देशाला विकसित करणारा एकमेव सक्षम घटक म्हणून देशातील तरुणाकडे पाहिले जाते. समाजाची प्रगती करण्याची जबाबदारी देशातील तरुणावर आहे. भारतीय संविधानाने १८वर्षा वरील स्त्रीपुरुषांना प्रौढ मताधिकाराचा अधिकार दिला आहे. निवडणुकीत मतदान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी १८ वर्ष वय पूर्ण झालेली असतात. त्यांना नव्याने मतदानाचा अधिकार मिळालेला असतो. अशा नवमतदाराची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु लोकसभा, विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुकीमध्ये होणाऱ्या मतदानाचे प्रमाण ५० ते ६० टक्के इतके आहे. देशातील युवा मतदार मतदानाबाबत आणि एकूणच राजकीय परिस्थिती विषयी काय विचार करतो हे जाणून घेणे महत्वाचे ठरते देशाच्या विकासात युवकांचा मोठा वाटा असतो. देशाची खरी संपत्ती किंवा शक्ती देशातील युवकच असतात. देशाचे भवितव्य त्या देशातील युवकांच्या दर्जावरून ठरत असते. या करिता युवकांना राजकीय दृष्टया अधिक सक्षम बनविणे गरजेचे आहे. राजकारणात युवकांचे सक्रीय योगदान असणे आज गरजेचे आहे. असे असतांना देशातील युवकांच्या मनात राजकीय जबाबदारीची भावना कितपत आहे. याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**प्रस्तुत प्रकल्पासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला. प्रश्नावलीतील १०० विद्यार्थ्यांनी प्रश्न अनुरूप दिलेली उत्तरे पुढीलप्रमाणे**

**प्रश्न:१**आपली मतदार म्हणून नोंदणी झालेली आहे काय?असा विद्यार्थ्यांना प्रश्न केलाअसता या प्रश्नावर ५३% विद्यार्थ्यांनी 'होय' असे उत्तर दिले तर ४७%विद्यार्थ्यांनी'नाही'असे उत्तर दिले. या प्रश्नावरून असे लक्षात येते की ५३%च विद्यार्थी मतदार नोंदणी करिता जागरूक आहेत.

**प्रश्न:२** मतदार म्हणून नोंदणी झालेली नसेल तर ती का करण्यात आली नाही? या प्रश्नावर ४% विद्यार्थ्यांना माहिती नव्हती.४७% विद्यार्थ्यानी नोंदणी करणार आहोत असे सांगितले. तर ४९% विद्यार्थांना नोंदणीची गरज वाटली नाही. याप्रश्नावरून असे लक्षात येते की अर्ध्या विद्यार्थ्यांना नोंदणीची गरज वाटली नाही.

**प्रश्न:३** याआधी झालेल्या निवडणुकीत आपण मतदान केलेले आहे का? असा प्रश्न केला असता ७६% विद्यार्थ्यानी 'नाही' असे उत्तर दिले. तर२४% विद्यार्थ्यांनी 'होय' असे उत्तर दिले. यावरून असे लक्षात येते की फार कमी विद्यार्थ्यांनी निवडणुकीत मतदान केलेले आहे.

**प्रश्न:४** स्थानिक स्वराज्य संस्था विषयी आपणास माहिती आहे काय? असा प्रश्न केला असता ७०%विद्यार्थ्यानी 'होय' असे उत्तर दिले.२८ % विद्यार्थ्यानी माहिती नाही असे उत्तर दिले. तर २% विद्यार्थ्यांनी उत्तरच दिले नाही. यावरून हे स्पष्ट होते की, बहुसंख्य विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेविषयी माहिती आहे असे दिसून येते.

**प्रश्न:५** आपल्या वार्डातील सभासदाचे नाव माहित आहे का? असा प्रश्न विचारला असता ७५% विद्यार्थ्यांनी 'होय' असे उत्तर दिले. २३% विद्यार्थ्यांनी सभासदाचे नाव माहित नसल्याचे सांगितले. तर २% विद्यार्थ्यांनी प्रश्नाचे उत्तर दिले नाही. यावरून बहुसंख्य विद्यार्थ्यांना सभासदाचे नाव माहित आहे असे दिसून येते.

**प्रश्न:६** आपण देशाचे जबाबदार नागरिक आहोत असे आपणास वाटते का? असा प्रश्न विचारला असता९३% विद्यार्थ्यानी होय असे उत्तर दिले, ५% विद्यार्थ्यानी नाही असे उत्तर दिले तर २% विद्यार्थ्यानी उत्तर दिलेच नाही. यावरून असे लक्षात येते की बहुसंख्य विद्यार्थी हे देशाचे जबाबदार नागरिक आहोत याची त्यांना जाणीव आहे.

**प्रश्न:७** आपले स्वतःचे मत महत्वाचे आहे असे आपणास वाटते का? असा प्रश्न केला अमता ९७% विद्यार्थ्यांनी होय असे उत्तर दिले तर ३% विद्यार्थ्यांनी नाही अमे उत्तर दिले. यावरून असा निष्कर्ष निघतो की बहुसंख्य विद्यार्थ्यांना आपले मत महत्वपूर्ण वाटते.

**प्रश्न:८** आपणास आपल्या गावातील समस्या माहित आहेत का? अमा प्रश्न केला अमता ५९% विद्यार्थ्यांना समस्या माहिती आहे, ५% विद्यार्थ्यांना समस्या माहित नाही तर ३४% विद्यार्थ्यांना काही काही समस्या बद्दल माहिती आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की अर्ध्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना गावातील समस्या बद्दल माहिती आहे.

**प्रश्न:९** गावातील समस्या सोडविण्यासाठी आपण काही करू शकता का असे आपणास वाटते का? असा प्रश्न केला असता ८३% विद्यार्थ्यांनी होय असे उत्तर दिले, ३% विद्यार्थ्यांनी नाही असे उत्तर दिले तर १४% विद्यार्थ्यांना माहिती नाही. यावरून असा निष्कर्ष निघतो की बहुसंख्य विद्यार्थी गावातील समस्या सोडवू शकतात.

**प्रश्न:१०** गावातील स्वच्छ व पारदर्शक राजकारणासाठी आपण मदत करू शकता अमे आपणास वाटते का? असा प्रश्न केला असता ९०% विद्यार्थ्यांनी होय असे उत्तर दिले तर १०% विद्यार्थ्यांनी नाही असे उत्तर दिले. यावरून असा निष्कर्ष निघतो की बहुसंख्य विद्यार्थी स्वच्छ व पारदर्शक राजकारणासाठी मदत करू शकतात.

# निष्कर्ष

## प्रस्तुत सर्वेक्षणात्मक प्रकल्पातून पुढील प्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले

वरिष्ठ महाविद्यालयातील 100 स्नातक विद्यार्थ्यांची प्रश्नावली द्वारा मुलाखत घेऊन 10 प्रश्न विचारण्यात आले. यावरून असा निष्कर्ष काढण्यात आला की वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेले विद्यार्थी नवमतदार असले तरी त्यांच्यातील 53% म्हणजे अर्धे विद्यार्थ्यांच हे मतदार म्हणून नोंदणी करण्यास जागरूक आहे, तरी अर्धे विद्यार्थ्यांमध्ये मतदार म्हणून नोंदणी करण्यास जागरूकता नाही.आपण मतदार म्हणून लगेच नोंदणी करावी याविषयी त्यांच्यात जागरूकता नाही. स्वतःहून मतदार नोंदणीचे काम ते करत नाही असे दिसते. फार कमी विद्यार्थ्यांनी निवडणुकीत मतदान केले आहे. आपल्या गावातील स्थानिक स्वराज्य संस्थांविषयी विद्यार्थी जागरूक आहे. विद्यार्थ्यांना आपले लोकप्रतिनिधी माहीत आहे आणि आपण देशाचे जबाबदार नागरिक आहोत याची जाणीव त्यांना आहे. याशिवाय आपले मत फार महत्त्वाचे आहे व आपल्या एकमताने बरेच काही होऊ शकते ही जबाबदारी विद्यार्थ्यांना कळते. शिवाय गावातील समस्यांविषयी विद्यार्थी जागरूक आहेत.आपल्या देशाचे तसेच आपल्या गावाचे राजकारण जाणून घेऊ शकतो, त्यात सुधारणा घडून आणू शकतो याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये आहे.आपल्या गावातील समस्या विद्यार्थी समजून घेतात.त्या सोडवण्यासाठी आपण जबाबदारी घेऊ शकतो याची जाणीव त्यांना आहे.वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची राजकारणाबाबतची जाणीव समाधानकारक आहे.असा या प्रकल्पातून निष्कर्ष निघतो.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जी

## ❀ राज्यशास्त्र विभाग ❀ सत्र-२०२२-२३ ❀ प्रकल्पाचा विषय ❀

## "वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय जबाबदारीचा अभ्यास"




1 रुतुजा साहेबराव भामणकर
MA-II




2 आचल विनोद गायगोले
BA-III




3 ऐश्वर्या त्रंबकराव वांजारी
BSC-III




4 वैभवी दिनेशराव अस्वार
BA-II




5 श्याम रवींद्र रेखाते
BSC-III





6 अंजली गजानन गाईगोले
BA-III




7 क्रितीका जितेंद्र तायडे
BSC-III




8 रसीका प्रमोद निमजे
BA-III




9 रोशन राजेंद्र इंगळे
BA-III

# देशोन्नती

## राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप

देशोन्नती वृत्तसंकलन...



**अंजनगाव सुर्जी** ▪ येथील श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या राजकीय जबाबदारीचा अभ्यास, या विषयावर बीए भाग २ व भाग ३ मधील दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन वरिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील १०० विद्यार्थ्यांच्या मुलाखतीद्वारे त्यांना प्रश्न विचारून राजकीय जबाबदारीचा अभ्यास केला.

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची राजकारणाबाबतची जाणीव समाधानकारक आहे, असा निष्कर्ष या प्रकल्पातून निघाला. हा प्रकल्प राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुरेंद्र किन्हीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला.या प्रकल्पाकरिता प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे यांचे सहकार्य लाभले. या प्रकल्पात सहभागी विद्यार्थी भूषण गुळदे, आदित्य शेरकर, कु. नेहा सोनपरोते, चेतन वाकोडे, कु. शिवानी निंबोकर यांना प्राचार्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ. मंगेश डगवाल, डॉ. जुगल मालधुरे, डॉ. इंदल जाधव उपस्थित होते.

Deshonnati Edition
May 21, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

दिव्य मराठी

अमरावती सिटी 21-05-2023

# 'राजकीय जबाबदारी'चा अभ्यास

प्रतिनिधी | अंजनगाव सुर्जी

स्थानिक श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी राजकीय जबाबदारीचा अभ्यास कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन केले होते. या वेळी विद्यार्थ्यांच्या राजकीय जबाबदारीचा अभ्यास या विषयावर बीए द्वितीय व तृतीय वर्षाच्या दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन वरिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील १०० विद्यार्थ्यांच्या मुलाखतीद्वारे त्यांना प्रश्न विचारून राजकीय जबाबदारीचा अभ्यास केला.



राजकीय जबाबदारीचा अभ्यास कार्यक्रमाप्रसंगी प्राध्यापकांसह उपस्थित विद्यार्थी.

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची समाधानकारक आहे, असा निष्कर्ष या प्रकल्पातून निघाला. हा प्रकल्प राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरेंद्र किन्हीकर यांच्या मार्गदर्शनात पूर्ण करण्यात आला.

या प्रकल्पाकरिता प्राचार्य डॉ. वशिष्ठ सहभागी विद्यार्थी भूषण गुळदे, आदित्य शेरकर, नेहा सोनपरोते, चेतन वाकोडे, शिवानी निंबोकर यांना प्राचार्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ. मंगेश डगवाल, डॉ. जुगल मालधुरे, डॉ. इंदल

# SMT RADHABAI SARDA ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
# ANJANGOAN SURJI, DIST. AMRAVATI (MS)

NAAC Accredited 'A' with 3.21 CGPA

## Department of Political Science

# *Certificate*

This is to certify that ~~Mr~~/Miss Hrushikesh Purushottam Raut

of BA Part II has completed his/her the project under the title ***"Study of Political Responsibility of Senior College Students"*** under the supervision of Shri Surendra Kinhikar during the Academic Session 2022-23



Kinhikar

**Shri S H Kinhikar**
**Head, Political Science**

**Dr Bashisth Choubey**
**Principal**